नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०१/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. पारशिवनी** :– दिनांक १८/११/२०२० चे २३.५१ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २९०/२०२० कलम ३५४ (अ), ३२४ भादवी सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १८/११/२०२० चे २०.४५ वा. दरम्यान १७ वर्षीय पीडित/फिर्यादी ही आपले किराणा दुकानात बसली असता आरोपी नामे– अंकीत चंद्रभान सहारे, वय २४ वर्ष, रा. दहेगाव जोशी तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक १९/११/२०२० चे ०१.३४ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्रीमती मिना बारंगे पो.स्टे. पारशिवनी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक ३१/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. ओ. पी. जैस्वाल, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३२३ भादवी मध्ये ६ वर्ष महीने सश्रम कारावास व ५००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास व कलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास तसेच कलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/–रु. दंड व दंड न भरल्यास ७ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाझे, तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, श्री. किशोर निंबाळकर पोहवा श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर